# प्रेसनोट

दि.०५/१०/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, |
| आरोपीचे नांव व कार्यालय | पांडु पुनाजी मावळी, वय–३६ वर्ष, कनिष्ठ अभियंता, वर्ग–३, म.रा.वि.वि.कं. मर्यादीत, लिंपणगांव (काष्टी २ सेक्शन), ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १५,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १५,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, लिंपणगांव ग्रामपंचायतचे विद्युत बील थकलेले असल्यामुळे म.रा.वि.वि.कंपनीकडून ग्रामपंचायतीचे विद्युत कनेक्शन तोडले होते. आरोपी लोकसेवक पांडु पुनाजी मावळी,कनिष्ठ अभियंता, वर्ग–३, म.रा.वि.वि.कं. मर्यादीत, लिंपणगांव (काष्टी २ सेक्शन), ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांनी विद्युत कनेक्शन तोडलेमुळे गावचा पाणी पुरवठा बंद होत असल्याने तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक मावळी यांची भेट घेवून विद्युत पुरवठा सुरळीत सुरु करुन देणेबाबत विनंती केली असता आरोपी लोकसेवक मावळी यांनी त्यांच्याकडे २०,०००/– रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.५/१०/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणीत आरोपी लोकसेवक मावळी यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष १५०००/– रुपये लाचेची मागणी केली व आज दि.५/१०/२०२१ रोजी हॉटेल श्रावणी, लिंपणगांव, ता.श्रीगोंदा येथे आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक मावळी यांनी तक्रारदार यांचेकडुन १५०००/– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारली असता आरोपी लोकसेवक मावळी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर